MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात

**बीड जिल्ह्यात सुरू असलेल्या अनेक अवैध धंद्या विरोधात दैनिक महाराष्ट्र आरंभ सतत लिहिणार असून, सुरू असलेले अवैध धंदे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत त्यांच्या निदर्शनास आणणार आहे. यामुळे बीड जिल्ह्यात सुरू असलेल्या अवैध धंद्याची माहिती सर्व सामान्यांनी द्यावे.!**

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०२ | अंक -१२२ | शुक्रवार दि.१७ जानेवारी २०२५ | आरएनआय -एमएएचएमआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रु | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -122 | FRIDAY DT.17 JANUARY 2025 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# बीड जिल्ह्यात अनेक पोलीस स्टेशन मध्ये वाल्मीक कराडच्या गँगला पाठीशी घालणाऱ्या पोलीस अधिकारी कर्मचारी यांची उचल बांगडी होणे गरजेचे?



- बीड जिल्ह्यातील एक पोलीस कर्मचारी ते थेट आय जी ते गृहमंत्रालय वाल्मीक कराडच्या नेटवर्क माफिया पोलिसांच्या सेफ झोनमध्ये?
- छोट्या मोठ्या दारूचे रेट सोडल्या तर अनेक पोलीस स्टेशनमध्ये मोठे मासे पोलिसांचे आशीर्वादाने मोकाट?
- लाखोंची प्रत्येक महिन्याला वेगवेगळ्या बीटमध्ये उलाढाल ते पोलीस अधिकारी कर्मचारी कोण तपासणी करणे गरजेचे?
- बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी संपता संपेना वाल्मिक कराडची गँग बीड जिल्ह्यामध्ये माफियांच्या रुपात सक्रीय?
- वेगवेगळ्या पोलीस स्टेशन मध्ये आजही वादग्रस्त पोलीस कर्मचारी हप्ते वसुली करत आहेत?एसपी नवनीत कॉवत यांना अंधारात ठेवत नेमका हप्ते कोणासाठी गोळा करत आहेत याची चौकशी होणे गरजेचे?
- वाळू, मुरूम माफिया रात्री ते सकाळी सहा पर्यंत चोरून अनेक पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये वाहतूक राजवसपणे सुरूच?
- बीड जिल्ह्यातील २८ पोलीस स्टेशन अंतर्गत अनेक पोलिसांचे माफीयांसोबत लागेबांधे
- सगळ्यांच पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी उपस्थित कर्मचारी चे फोन कॉल डिटेल्स अनेक हॉटेलचे सीसीटीव्ही फुटेज तपासले तर राजरोसपणे माफीयांसोबत पोलिसांचा वावर?

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये बिहार पेक्षाही जास्त प्रमाणामध्ये दोन नंबरचा माफिया बोकाळला आहे बिहारचे नाव हे जरी गुन्हेगारी क्षेत्रामध्ये एखाद्या चित्रपटाला लाजवेल अशी परिस्थिती दाखवणाऱ्या डायरेक्टरला थेट माफीयांना कोण व कसा व कोणता नेता व नेत्याचा एखादा हाताखालचा कार्यकर्ता म्हणजेच वाल्मीक कराड सारखा माणूस जर एखाद्या पिक्चर मध्ये दाखवला तर तो पिक्चर लोक आवडीने पाहतात. तर बिहारला नाव ठेवतात असाच काहीसा प्रकार बीड जिल्ह्यामध्येही पाहायला मिळत आहे. बीड जिल्ह्यामध्ये परळीला मोठ्या प्रमाणामध्ये वाल्मीक कराड या व्यक्तीची दहशत आहे. तसेच बीड जिल्ह्यामध्ये सुद्धा वाल्मीक अण्णा कराड या माणसाची दहशत आता लोकांना दिसत आहे. अंधारातून असेल किंवा उजेडात असेल वाल्मीक कराडच्या मोठ्या मोठ्या गँग ह्या बीड जिल्ह्यामध्ये सक्रिय आहेत. वाल्मीक कराडच्या गँगला आता कोण रोखणार असा सवाल जनता करत असतानाच. मात्र बीड जिल्ह्यातील अनेक पोलीस स्टेशनचे पीआय, एपीआय व त्यांचे रायटर जे की बीड जिल्ह्यातील अनेक माफीयांचे दोन नंबरचे अड्डे धंदे हे त्यांना माहित आहेत अनेक पीआय, एपीआय पीएसआय यांचे रायटर असलेले व संबंधित बीट अंमलदार म्हणून फक्त पैसे गोळा करण्यासाठीच पोलीस प्रशासनात भरती झालेले काही मोजकेच बोटावर मोजावीत ईतकेच पोलीस कर्मचारी हे मात्र बीड जिल्ह्यातील माफी यांना राजरोसपणे फोनवरती व्हाट्सअप चॅटिंग व्हाट्सअप कॉल व फोन कॉल द्वारे अनेक माफीयांची लांगी-बांधे असलेले आणि माफी यांची आर्थिक तडजोडी मध्ये हप्ते गोळा करून नेमका देतात कोणाला हे पाहणे गरजेचे आहे. तर संबंधित हप्ते गोळा केलेली माया नेमकी देतात कोणाला हे पाहणे गरजेचे देखील तितकेच महत्त्वाचे आहे.



कारण बीड जिल्ह्यामध्ये पत्त्याचे क्लब, मटक्याचे अड्डे, वाळू, मुरूम, दारू, हातभट्टी, देशी विदेशी दारूचे डुबलीकेट ठेपे , गांजा, गुटख्याचे मोठे मोठे माफिया कोण आहेत. हे संबंधित पोलीस स्टेशनच्या पीआय एपीआयसह रायटरला एकदा एसपी नवनीत कॉवत यांनी विचारले पाहिजे. बीड जिल्ह्यामध्ये अनेक ठिकाणी छोटे-मोठे दार उघडणे यापेक्षा नवनीत कॉवत त्यांच्या कार्यकाळात काही नवे झाले नाही तर राजरोषपणे हप्ते वसुली करणे,अपहरण, किडनॅपिंग, ३०७, ३०२ सारखे गुन्हे या ठिकाणी घडले आहेत तर दरोडा लूटमार, बंदुकीचा धाक, तलवारबाजी असे अनेक आरोपी आता पकडले आहेत. परंतु खरे गुन्हेगार अजूनही पडद्यामागेच आहेत. या सर्व गुन्हेगारांना पाठीशी घालण्यामध्ये बीड जिल्हा पोलीस प्रशासन आहे. कारण नव्याने आलेले बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांना अंधारात ठेवून बीड जिल्हा पोलीस प्रशासन नेमकं कोणाची पाठराखंड करत आहे हे अजून कळाले नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा गृहखात नेमकं हप्ते वसुली करून पोलीस स्टेशन ते गृह मंत्रालयापर्यंत हप्ते जात असल्याची चर्चा आता जनतेमधून बोलली जात आहे. वाल्मीक कराड सारखा माफिया हा बीडचा एका कॉलेज टेबल पासून ते थेट आयजी गृह मंत्रालयापर्यंत पोहोचला होता. एखांदा चित्रपट बनवायलाच हवा अशीही चर्चा वाल्मीक कराडच्या कारकिर्दीवरती व बीड जिल्हा पोलिसांच्या नाकर्तेपणावरती आज बीड जिल्ह्यातील जनतेकडून चर्चेचा विषय बनलेला आहे. एसपी नवनीत कॉवत यांना अंधारामध्ये ठेवून मात्र अनेक पोलीस अधिकारी कर्मचारी हे स्वतःचे आर्थिक माफी यांना पोसण्यात व्यस्त आहेत. बीड जिल्ह्यामध्ये अनेक मटका गुटका, पत्त्याचे क्लब, देशी-विदेशी, दारूचे अड्डे, हातभट्टी, अवैध ताडी विक्री सह बीड जिल्ह्यामध्ये गांजा व नशा चे औषधाचे मोठे रॉकेट सक्रिय आहेत. यामध्ये अनेक बीड जिल्ह्यातील मोक्का अंतर्गत कारवाया झालेले सुद्धा वाळू मुरूम माफिया गुन्हेगार खून दरोडा यासारख्या लोकांना पाठीशी घालणाऱ्या वाल्मीक कराडला आता पोलिसांनी जेरबंद जरी केले असले तरी त्याची गँग सध्या बीड जिल्ह्यामध्ये सक्रिय आहे. या गँगला बीड जिल्ह्यातील २८ पोलीस स्टेशनचे अनेक पोलीस अधिकारी कर्मचारी हे पाठीशी घालून त्यांचा पालन पोषण करत असल्याची बीड जिल्ह्यातील जनतेमध्ये चर्चा आहे. यामध्ये मात्र आता बीड जिल्ह्यातील जनता ही उघड्या डोळ्यांनी पाहत आहे वाल्मीकरांचा नंगानाच किती होता तर दहशत हाणामाऱ्या खून खंडणी आपण धमक्या सह अनेक वेगवेगळ्या गुन्ह्यातील गुन्हेगारांना पोसण्यात वाल्मीक कराड थेट एक साधारण पोलीस कर्मचारी ते बीडचे एसपी, पोलीस स्टेशनचे पीआय डीवायएसपी, छत्रपती संभाजी नगरचे आयजी ते गृहमंत्रालयातील मोठे अधिकारी ते गृहमंत्री असं त्याचं नेटवर्क आहे. या नेटवर्कच्या माध्यमातून अनेक माफीयांना पोसलेले आहे. आणि तो माफी आजही जिवंत आहे. बीड जिल्ह्याला नव्याने मिळालेले पोलीस अधीक्षक चांगला अधिकारी म्हणून नवनीत कॉवत साहेब मिळाले असले तरी बीडची जनता मात्र या माफियांपासून त्रस्त आहे. नवनीत कॉवत हे एसपी म्हणून काम पाहत आहेत. त्यांनी गुन्हेगारांना सोडून केले असताना मात्र आज सुद्धा नवनीत कावत यांना बीड जिल्ह्यातील अनेक पोलीस कर्मचारी अधिकारी हे अंधारात ठेवून राजरोसपणे अंधारातून दोन नंबरचे धंदे चालत आहेत. छोट्या-मोठ्या कारवाया दाखवून एसपीचे मन जिंकण्यापेक्षा मोठ्या माणसांना पकडणे गरजेचे आहे. त्यामुळे आजही वाल्मीक कराडांची दहशतवादी नेमकं कोण चालवत आहे हे पाहणे गरजेचे आहे. म्हणून अनेक पोलीस स्टेशन मध्ये अधिकारी कर्मचारी यांच्या बदलीची गरज आहे त्यामुळे एसपी नवनीत कॉवतांनी या प्रकरणात लक्ष घालणे गरजेचे आहे.

## फटाक्याचे आवाज काढणाऱ्या सायलेन्सवर

# बीड शहरातपुन्हा कारवाई ५१ ४३ हजाराची दंडात्मक कारवाई

बीड ।प्रतिनिधी

शहरासह बीड जिल्ह्यामध्ये फटाक्याचे आवाज काढणाऱ्या बुलेटचे सायलेन्सर काढून त्यावर रोलर फिरवण्याचा प्रकार पाठीमागे अनेकदा जिल्हा वाहतूक शाखेच्या टीमने केला असतानाच पुन्हा एकदा बीड शहरात गुरुवार दिनांक १६ नोव्हेंबर रोजी कारवाई हाती घेण्यात आली. या कारवाईमध्ये ११ बुलेट चे सायलेन्सर काढण्यात येण्याबरोबरच ५१ केसेस करून ४३ हजार ५०० रुपयांचा दंड आकारण्यात आला.

यासंदर्भात माहिती असे की बीड जिल्हा वाहतूक शाखेच्या वतीने वाहतूक कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या व वाहन नियमाची दखल न घेणाऱ्या वाहनधारकावर गेले काही महिन्यापासून कारवाईचा सपाटा लावलेला आहे. पाठीमागील काही दिवसाखाली शहर वाहतूक शाखेचे सपोनि सुभाष सानप आणि त्यांच्या टीमने फटाक्याचे आवाज काढणाऱ्या बुलेटचे सायलेन्सर काढून त्याच्यावर रोलर फिरवण्याचे काम केले होते . याची धास्ती घेऊन कित्येक बुलेट चालकांनी असे बसविलेले सायलेन्सर देखील काढले होते. परंतु काही लोक या सदर्भात दखल घ्यायला तयार नव्हते. फटाक्याचे आवाज काढणाऱ्या बुलेटमुळे मोठ्या प्रमाणात ध्वनी प्रदूषण होत असतानाच असा आवाज निघताच लहान मुले देखील दचकण्याचे प्रकार होऊ लागले. तेव्हा सपोनी सुभाष सानप आणि त्यांच्या टीमने गुरुवार दिनांक १६ जानेवारी रोजी सायंकाळी बस स्थानकासमोर अशा बुलेटचे सायलेन्सर काढण्याची मोहीम राबवली. यात ११ बुलेटचे सायलेन्सर काढण्यात आले. तर सुमारे ५१ वाहनावर केसेस करून सुमारे ४३ हजार ५०० रुपयांचा दंड करण्यात आला.यात नेम प्लेटवर मामा, काका, दादा असा उल्लेख असलेल्या व फॅन्सी नंबर टाकलेल्या कर्कश हॉर्न बसवलेल्या वाहनांचा समावेश आहे.

# नगदनारायण कॉलनीतील नागरीकांनी जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्केंचा केला सत्कार



बीड ।प्रतिनिधी

बीड शहरातील नगद नारायण कॉलनीतील नागरिकांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नुतन बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांचा सत्कार पुढील राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. बीड शहरातील नगर राजेंद्र मस्के यांनी सातत्याने नगद नारायण कॉलनीतील नागरिकांसी संपर्क ठेवला. त्यांच्याशी संवाद साधून विविध समस्या लक्षात घेऊन त्यांना मदत करण्याचे काम केले. रस्त्याच्या दुरावस्थे मुळे नागरिकांचे होणारे हाल लक्षात घेऊन तेथे रस्ता व नालीचे काम करून त्यांना दिलासा दिला. आज संघर्षयोद्धा संपर्क कार्यालयात येथील नागरिकांनी राजेंद्र मस्के त्यांचा सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी गव्हाणे सर, कथले सर, काळे सर, मेंगडे सर, ठोंबरे सर, गहीनाथ भिसे,अशोक देवगुडे, विष्णु वारे,विजय रंजेगावकर

# अंबाजोगाई येथील व्यापारी हल्ला व लुट प्रकरणी २४ तासांतच पोलिसांनी आरोपींना ठोकल्या बेड्या!

## स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कामगिरी; मुद्देमाल जप्त



बीड । प्रतिनिधी

बीड : अंबाजोगाई शहरात दिवसभराचे काम आटोपून घराकडे निघालेल्या तरुण व्यापाऱ्यावर अज्ञात हल्लेखोरांनी प्राणघातक हल्ला केला होता. ही घटना अंबाजोगाई शहरातील शासकीय विश्रामगृहासमोर दि.१५-०१-२०२४ रोजी रात्री ९ वाजेच्या दरम्यान घडली होती. सुजीत श्रीकृष्ण सोनी (रा. अंबाजोगाई) असे हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या व्यापाऱ्याचे नाव आहे. त्यांच्या जवळील एक सोन्याची अंगठी, वनप्लस मोबाईल, बळजबरीने चोरट्यांनी हिसकावून घेऊन गेले होते. याबाबत आंबेजोगाई येथील शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी अंबाजोगाई शहर पोलीस व स्थानिक गुन्हे शाखा यांना आरोपींचा शोध घेऊन गुन्हा उकळ करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उस्मान शेख यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा येथील पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे यांच्या नेतृत्वाखाली पथक तयार करून गुन्ह्याचा समांतर तपास सुरू केला होता. सदर गुन्ह्याचा तपास करीत असताना व्यापारी सुमित सोनी यांच्या दुकानात काम करणारा अनिकेत महादेव मगर (रा. महात्मा फुले नगर, अंबाजोगाई) यांच्यावर संशय आल्याने तपास पथकाने त्यास ताब्यात घेऊन विश्वासात घेऊन विचारपूस केली असता त्यांनी सदरचा गुन्हा केल्याचे कबुल केला. त्याचा साथीदार तेजस अनिल तुरुकमारे, (रा. स्नेहनगर, अंबाजोगाई) कृष्णा दत्ता मुंडे (रा. वडारवाडा अंबाजोगाई) व त्यांचा एक अल्पवयीन साथीदारांनी केला असल्याची कबुली दिली. त्यावरून त्यांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून गुन्ह्यात चोरीस गेलेला दहा हजार किमतीचा मोबाईल व ५३ हजार ७६० रूपये किमतीची ६ ग्रॅम ७२० मिली वजनाची सोन्याची अंगठी व गुन्ह्यात वापरलेली जुनी एक मोटर सायकल असा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर गुन्ह्याचा तपास पोलिसांनी २४ तासाच्या आत केला असून यातील जखमी व्यापारी सुजित सोनी हे झालेल्या घटनेनंतर घाबरलेले असल्याने त्यांना घटनास्थळ आठवण नव्हते. परंतु पोलिसांनी तांत्रिक तपास करून घटनास्थळ निश्चित केले त्यानंतर जल गतीने तपास करून सदरचा गुन्हा उघडकीस आणला आहे.

सदरील कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल चोरमले यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उस्मान शेख, पोनि घोळवे, अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्याचे सपोनि निलंगेकर, पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, पोह कांबळे, पोह जायभाये, पोह पठाण, पोह राठोड, पोह सानप, पोह आंधळे, पोह वडमारे व चालक यांनी केली आहे.

# पतंग उडवताना नायलॉन मांजा टाळा- जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक थोरात



## नायलॉन मांजा जीव घेऊ शकतो काळजी घ्या

बीड ।प्रतिनिधी

पतंग उडवताना नायलॉन मांजाचा वापर टाळा.नायलॉन मांजा दुसऱ्याचा जीव घेऊ शकतो, पतंग उडवताना काळजी घ्या. असे आवाहन बीडचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक थोरात यांनी केले आहे. बीड शहरातील सावता माळी चौकात एका दुचाकीस्वाराच्या गळ्याला नायलॉन मांजा अडकल्याने तो जखमी झाला. सुदैवाने त्याच्या लक्षात आल्याने दुर्घटना टळली आणि तो बाल बाल बचावला. मात्र त्याच्या गळ्याला आणि हाताला जखम झाली आहे.. बीड शहरात आणि जिल्ह्यात अनेक ठिकाणी पतंग उडवताना काळजी घेतली जात नाही. त्यातून गंभीर अपघात होवू शकतात.

# कला गुणांनी भरघोस यश



पिंपरी चिंचवड परिसरात जानेवारी महिन्यात राबवली जाणारी संस्कार जत्रा यांचे सर्वेसर्वा मा .श्री मोहन गायकवाड सर नेहमीच विद्यार्थ्यांना एक व्यासपीठ मिळवून देत असतात त्या कार्यक्रमांतर्गत विविध स्पर्धा इथे घेतल्या जातात आणि या स्पर्धेत निगडी परिसरातील शिवभूमी विद्यालयातील विद्यार्थी भाग घेत असतात यावर्षीही पुष्कळ मुलांनी प्रत्येक स्पर्धेत सहभाग घेऊन शाळेला बक्षीस प्राप्त केले . ८ जानेवारीला झालेल्या चित्ररंगभरण स्पर्धेत तसेच मॅथ मस्ती आणि हस्ताक्षर स्पर्धेत विद्यार्थ्यांनी आपल्या कला गुणांनी भरघोस यश मिळवले .यातील वैयक्तिक नृत्य मध्ये इयत्ता पहिलीतील सई जोशी हिने दुसरा क्रमांक मिळवला .तर श्रीमद्भगवद्गीता बारावा श्लोक म्हणून इयत्ता पाचवीतील आरती यादव हिने प्रथम क्रमांक पटकावला . वक्तृत्व स्पर्धेमध्ये इशिता फडतरे इ २ री हिने तृतीय क्रमांक मिळवला.तसेच वेशभूषा स्पर्धेत इयत्ता पहिलीतील काव्या पाटोळे हिने दुसरा क्रमांक तर श्लोक तिकोडे (१ली )व इ २ री तील देशमूख सारंग या दोघांनी उत्तेजनार्थ बक्षीस मिळवले . रांगोळी स्पर्धेत सुंदर रांगोळी काढून इ ६वीतील विस्वजा जाधव हिने दुसरा क्रमांक पटकवला आणि समूहनृत्य स्पर्धेमध्ये गणेशगीत या गाण्यावर नृत्य करून इ १ली २री च्या गटातून या नृत्याला प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळाले .वरील सर्व स्पर्धेत शाळेच्या मा .मुख्याध्यापिका सौ अश्विनी पाटील मॅडम यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले त्यांच्या मार्गदर्शनाखाली त्या शाळेतील उपक्रमशील तंत्रशिक्षिका लेखिका कवयित्री कोठेकर मॅडम या दरवर्षी विद्यार्थ्यांना बाह्य स्पर्धेत भाग घेण्यास प्रोत्साहित करत असतात त्यासाठी त्या स्वतः विद्यार्थ्यांचे पाठांतर घेतात त्यांना मार्गदर्शन करतात त्या स्पर्धेला घेऊन जातात आणि विद्यार्थ्यांना उत्तेजन देतात त्यांच्याही कष्टाचे चीज होण्यासाठी संस्कार जत्रेचे आयोजक गायकवाड सरांनी साऊथचे सिने कलाकार देवसिंह गिल, शिक्षण आयुक्त शेखर सिंग पोलिस आयुक्त यांच्या उपस्थित सन्मानचिन्ह व पुष्प देऊन सन्मानित केले तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका सौ पाटील यांना आदर्श मुख्याध्यापकांचा पुरस्कार यांना देण्यात आला त्यामुळे उपक्रमशील शिक्षिका कवयित्री कोठेकर योगिता व मुख्याध्यापकांचे सर्व क्षेत्रातून अभिनंदन केले जात आहे व पुढील वर्षी जास्तीत जास्त विद्यार्थी आपले कला गुण सादर करतील अशी खात्री पालकांनाही वाटत आहे नक्कीच यातून उद्याचे कलाकार निर्माण होतील यात शंका नाही

## स्व संतोष देशमुखांना न्याय देण्यासाठी लढणा-या योद्ध्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी कारी येथे दुग्धाभिषेक




माजलगांव ।प्रतिनिधी

मस्साजोगचे सरपंच स्व. संतोष देशमुख यांना न्याय मिळावा अमानुष हत्याकांडातील आरोपींना कठोरात कठोर शिक्षा व्हावी यासाठी लोकशाही मार्गाने रस्त्यावरील लढाई लढणाऱ्या मराठा आरक्षण योध्दा मनोजजी जरांगे पाटील आणि सभागृहात लढाई लढणारे आ. सुरेश आण्णा धस, आ. संदिप क्षीरसागर, आ. प्रकाश सोळंके यांच्या प्रतिमेची दि. १४ मंगळवार रोजी वाल्मिक कराड यांना पोलीस प्रशासनाने मकोका अंतर्गत गुन्हा दाखल केल्यानंतर परळीतील वाल्मिक कराड समर्थकांनी गदारोळ करत सार्वजनिक ठिकाणी मा. मनोजजी जरांगे पाटील, आ. सुरेश आण्णा धस, आ.संदिप क्षीरसागर, यांच्या प्रतिमेची विटंबना केली होती. वास्तविक पाहता लोकप्रतिनिधींनी स्व. संतोष देशमुख यांना न्याय मिळवण्यासाठी संविधानिक पद्धतीने सभागृहात व रस्त्यावर आवाज उठवला म्हणुन काल दि.१६ गुरुवार रोजी सकाळी ९ वाजता कारी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात मध्ये वरील लोकप्रतिनिधींच्या प्रतिमेला दुधआभिषेक केला.यावेळी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी सकल मराठा बांधव कारी उपस्थित होते

## बीड रेल्वे स्थानक ला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव द्या.माझी सैनिक वीर

### माजी सैनिक अनुरथ वीर यांच्या उपोषणाचा आज पाचवा दिवस




बीड / प्रतिनिधी

जिल्ह्यातील जनतेसाठी अत्यंत महत्त्वाचे असणाऱ्या बीड रेल्वे प्रश्न मार्गी लागला असून येत्या काही दिवसात बीड रेल्वे स्थानकाचे उद्घाटन होणार असून होणाऱ्या उद्घाटनापूर्वीच बीड रेल्वे स्थानक ला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे या मागणीसाठीमाजी सैनिक अनुरथ वीर हे जिल्हाधिकारी कार्यालय समोर गेल्या पाच दिवसापासून आमरण उपोषणास बसले आहे. त्यांच्या उपोषणाला जिल्ह्यातील सर्व पक्ष संघटनांनी पाठिंबा दर्शविला असून आता सर्वसामान्य जनतेकडून ही बीड रेल्वे स्थानकाला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचेच नाव देण्यात यावे अशी मागणी होत आहे असे की,बीड रेल्वे चालक या उद्घाटन सोहळा दिनांक २६ जानेवारी २०२५ रोजी शासनाने करण्याचे निश्चीत केले आहे तरी मी या अगोदर आमरण उपोषण दिनांक १०/१०/२०२४ रोजी केलेले आहे. परंतु सदरील रेल्वे स्थानक डॉ.बाबासाहेब आंबेडकर रेल्वे स्थानक बीड असे नाव देण्यासाठी शासनाने व लोक प्रतिनिधीनी मला अश्वासन दिले होते.परंतु आज पर्यंत याबाबद कसलेही पत्र व्यवहार किंवा विश्वसात न घेता उद्घाटन करण्याचे निश्चित केले आहे. परंतु हे शासन स्तरावर अर्जपर्यंत यांनी नाव घोषीत केलेले नाही.तरी येत्या २६ जानेवारी बीड रेल्वे स्थानकाच्या उद्घाटनापूर्वीच बीड रेल्वे स्थानकला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे या मागणीसाठी आज पाचव्या दिवशी ही माजी सैनिक अनुरथ वीरही आमरण उपोषणावर बसले असून त्यांची प्रकृती खाली दिलेली आहे. २६ जानेवारी पूर्वीचे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे नाव बीड रेल्वे स्थानकाला दिले गेले नाहीत तर आंबेडकर जनता रस्त्यावर उतरणार असल्याचे व उद्घाटन होऊ देणार नसल्याचा तीव्र भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केल्या.तरी जिल्हा प्रशासन कडून उपोषण कर्त्याचे दखल न घेतल्याने आज जिल्ह्यातील सर्व पक्ष संघटनांच्या लोकप्रतिनिधी कडून एक शिष्ट मंडळाने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

# एकता मराठी साहित्य संमेलनाचे आज उद्घाटन

### मा.आ.सुरेश धस उद्घाटक तर संमेलनाध्यक्ष प्राचार्या डॉ.दिपाताई क्षीरसागर

शिरूर कासार (प्रशांत बाफना)

वेदनेला फुंकर माणुसकीची हे ब्रीदवाक्य घेऊन गेल्या दशकापासून एकता फाउंडेशन, शिरूर कासार (महाराष्ट्र राज्य) ही संस्था शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि पर्यावरण क्षेत्रात कार्य करत असून गेल्या सात वर्षांपासून राज्यस्तरीय एकता मराठी साहित्य संमेलनांचे ही आयोजन करत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा, तसेच नव्याने लिहिणाऱ्या कवी लेखकांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध व्हावे या उदात्त हेतूने प्रेरित होऊन एकता फाउंडेशनच्या सर्वच पदाधिकाऱ्यांसह सभासद आणि कार्यकर्ते उत्साहाने व निर्हेतूकपणे काम करतात.

आज दि.१७ रोजी दहिवंडी येथील महात्मा फुले विद्यालयात राष्ट्रसंत भगवान बाबा साहित्य नगरीमध्ये संपन्न



होणाऱ्या ७ व्या एकता मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन माजी मंत्री, आमदार मा.सुरेश आण्णा धस हे करणार आहेत. ह.भ.प.राधाताई महाराज आणि महंत विवेकानंद शास्त्री यांची आशिर्वादपर तर महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे सदस्य डॉ.राजेश गायकवाड आणि माजी सदस्य मा.विलास सिंदगीकर हे विशेष निमंत्रित म्हणून आणि सामाजिक कार्यकर्त्या सुशिलाताई मोराळे यांची विशेष उपस्थिती असणार असल्याची माहिती कार्यक्रमाच्या स्वागताध्यक्षा एड.भाग्यश्री ढाकणे, समस्त दहिवंडी ग्रामस्थ आणि एकताच्या पदाधिकाऱ्यांनी माध्यमांना दिली.

तालुक्याचे तहसीलदार, कार्यकारी अभियंता, जिल्हा कृषी अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, गटविकास अधिकारी, पोलिस निरीक्षक, तालुका कृषी अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत पद्मश्री शबीर सय्यद यांना जीवन गौरव, राज्यस्तरीय एकता आदर्श शिक्षक पुरस्कार श्रीम.उषा ढेरे, स्व.भगवानराव चेमटे राज्यस्तरीय एकता सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान, एकलव्य विद्या संकुल, यमगरवाडी, स्व.कमलबाई राजाभाऊ खेडकर राज्यस्तरीय उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता पुरस्कार सुधारक जाधव (कै.किसनराव जाधव सार्व.वाचनालय, रायमोह). स्व.नाणीबाई शामराव कंधारे राज्यस्तरीय वन्यजीव संवर्धन आणि संगोपन पुरस्कार श्री.व सौ.सृष्टी सिद्धार्थ सोनवणे (सर्पराज्ञी वन्यजीव पुनर्वसन प्रकल्प, तागडगाव). जिल्हास्तरीय एकता आदर्श शिक्षक पुरस्कार गोरक्ष नामदेव खेडकर (कें.प्र.तथा केंद्रीय मुख्याध्यापक, कन्या शाळा शिरूर का.जि.बीड यांना वितरित करण्यात येणार आहेत.

लेखक आपल्या भेटीला या उपक्रमांतर्गत दि.१७ रोजी दुपारी ३ वाजता इ.५ वी च्या पाठ्यपुस्तकातील 'सावरपाडा एक्स्प्रेस-कविता राऊत' या पाठाचे लेखक संतोष साबळे व इ.८ वीच्या पाठ्यपुस्तकातील 'गोधडी' कवितेचे कवी डॉ.कैलास दौंड यांची मुलाखत शालेय विद्यार्थी घेणार आहेत.

# निर्भिड पत्रकार संघाचे पुरस्कार जाहिर

### मुकनायक पुरस्कार संपादक विजयकुमार वाव्हळ , ज्ञानेश्वर लंगे व अरविंद ओव्हाळ यांना जाहिर माजलगाव भूषण पुरस्काराने विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य केलेल्या मान्यवरांचा होणार सन्मान



माजलगाव ।प्रतिनिधी

माजलगाव निर्भिड पत्रकार संघाच्या वतीने येथील मुकनायक व माजलगाव भूषण पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असुन या वर्षीच्या मुकनायक पूरस्काराचे मानकरी संपादक विजयकुमार वाव्हळ , ज्ञानेश्वर लंगे , अरविंद ओव्हाळ यांना जाहिर करण्यात आले आहेत तर माजलगाव भुषण पुरस्कारासाठी सामाजिक क्षेत्रातील विजयदादा साळवे , संभाजी आबा शेजुळ , डॉ. दिपक कोडगीरकर , शिवाज्ञा कोचिंग क्लासेस चे संस्थापक जिवन नखाते सर , रघुप्रराघ पतसंस्थेचे चेअरमन सागर खुर्पे, मुख्याध्यापक किशोर मोताळे , नवनाथ गिलबिले सर , सरपंच भागवत शेजुळ , ग्रामसेवक आनंदकुमार सिरसट , ड. अजित जगताप , तलाठी प्रमोद चव्हाण , पिके उद्योग समुहाचे पद्माकर कांबळे , नगर सेवक शरद यादव , पाटिल साहेब प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष श्रीराम नरवडे , महसुल सेविका सौ. कौशल्याताई दत्ता कांबळे व समाज सेवक इफ्तेखार जक्की बाबा सोशल वेलफेअर फाउंडेशनचे अध्यक्ष शेख शौकत यांना जाहिर करण्यात आले असून मुकनायक दिनाचे औचित्य साधून विविध नामांकित मान्यवरांच्या उपस्थित या पुरस्काराचे वितरण सोहळ्याचे आयोजन केले असल्याची माहिती प्रसिद्धी पत्रकाद्वारे निर्भिड पत्रकार संघाचे अध्यक्ष बाळासाहेब आडागळे दिली आहे.

माजलगाव निर्भीड पत्रकार संघाच्या वतीने प्रतिवर्षी पत्रकारितेतील क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या पत्रकारांसह माजलगाव तालुक्यातील सामाजिक कार्य, रुग्न सेवा, उत्कृष्ट उद्योजक, उत्कृष्ट सहकार , आदर्श सरपंच, आदर्श तलाठी , आदर्श ग्रामसेवक, आदर्श शिक्षक, आदर्श नगरसेवक, आदर्श शैक्षणिक संस्थाचालक, आदर्श विधीतज्ञ , आदर्श महसूल सेविका,उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या बीड जिल्ह्यातील व माजलगाव तालुक्याच्या मातीतील व्यक्तीस मूकनायक व माजलगाव भूषण पुरस्कार देऊन गेल्या पाच वर्षापासून सन्मानित करण्यात येते. यावर्षी या पुरस्काराचे सहावे वर्ष असून यावर्षीचे मुकनायक पुरस्काराचे मानकरी संपादक विजय वाव्हळ, ज्ञानेश्वर लंगे, अरविंद ओव्हाळ, तर माजलगाव भूषण पुरस्काराचे मानकरी विजय साळवे, (सामाजिक ) संभाजी शेजुळ (समाज भुषण ) डॉक्टर दिपक कोडगिरकर (आरोग्य सेवा) जीवन नखाते (उत्कृष्ट शिक्षण संस्था चालक) चेअरमन सागर खुर्पे (सहकार क्षेत्र) किशोर मोताळे, (आदर्श मुख्याध्यापक) नवनाथ गिलबिले (आदर्श शिक्षक) भागवत शेजुळ (आदर्श सरपंच) आनंदकुमार सिरसट (आदर्श ग्रामसेवक) अँड. अजित जगताप (उत्कृष्ट विधीज्ञ) प्रमोद चव्हाण (आदर्श तलाठी) पद्माकर कांबळे, (उत्कृष्ट व्यावसायिक ) शरद यादव (आदर्श नगरसेवक) श्रीराम नरवडे (उत्कृष्ट समाजकार्य) कौशल्याताई लोखंडे, (आदर्श महसूल सेविका) शौकत शेख समाजसेवक इफ्तेखार जक्की बाबा सोशल अँड वेलफेअर फाउंडेशन (आदर्श फाउंडेशन) यांना जाहीर झाले असून मूकनायक व माजलगाव भूषण पुरस्काराचे वितरण लवकरच मूकनायक दिनाचे औचित्य साधून विविध नामांकित मान्यवराच्या उपस्थित भव्य दिव्य समारंभ सोहळा पार पडणार असल्याची माहिती माजलगाव निर्भीड पत्रकार संघाचे अध्यक्ष बाळासाहेब आडागळे, परमेश्वर सोळंके, अमर साळवे, शेख हमीद, राजरत्न डोंगरे, सिद्धेश्वर गायकवाड, संतोष रासवे, विजय कापसे, अनिकेत भिलेगावकर, विजय डावरे, दिगंबर गिरी, ज्येष्ठ पत्रकार प्रदीप कुलकर्णी,

## शेतकऱ्यांकडून बाँड पेपरवरची मागणी बंद करा अन्यथा अंदोलन करु : वंचितची मागणी

गेवराई ।प्रतिनिधी

तालुक्यातील २०२४ या खरीप हंगामातील पिके अतिवृष्टीमुळे वाया गेले होते. त्या पिकांची नुकसान भरपाई म्हणून शासन अत्यंत उशिराने तुटपुंजी मदत देत आहेत. त्यातच अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी या समाईक क्षेत्र असल्याने खात्यावर रक्कम जमा करण्यासाठी ७/१२ वर समाईक जमिन असल्याने तलाठी शेतकऱ्यांकडून बाँडवर नोटरीसह संमतीपत्राची मागणी करत आहेत. यामुळे शेतकऱ्यांना नाहक अर्थीक भुर्दंड सोसावा लागत असल्याने सदरील बाँडपेपरवरील संमतीपत्राची अट रद्द करण्यात यावी अन्यथा शेतकऱ्यांसह तहसिल कार्यालयावर तिव्र स्वरूपाचे अंदोलन करु असा ईशारा वंचीत बहुजन आघाडी गेवराई तालुक्याच्या वतीने राजेंद्र पोकळे, पप्पु



गायकवाड, किशोर भोले, ज्ञानेश्वर हवाले यांच्या स्वाक्षरीने देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे.

# स्थानिक गुन्हे शाखा-बीड कामगिरी बीड बस स्थानकामध्ये बसधुन प्रवाशांचे दागिने चोरी करणारी महिला स्था.गु.शा. बीड ने केली जेरबंद १० तोळयाचा सोन्याचा मुद्देमाल केला जप्त

**बीड ।प्रतिनिधी**

**फिर्यादी श्रीमती पल्लवी काकडे, व्यवसाय नोकरी, रा.साबला ता.केज ह.मु.चंद्रपुर यांनी पो.स्टे.शिवाजीनगर बीड येथे दिनांक ०८/११/२०२४ रोजी तक्रार दिली की, दिनांक ०३/११/२०२४ रोजी ०९०० वा. दरम्यान बीड बस स्थानक येथे संभाजीनगर ते अंबाजोगाई बस मध्य बसल्या असतांना त्यांचे जवळील बॅग मधील सोन्याचे विविध दागिने १६.१ तोळे कि.अं.१०,१६,०००/- रु चे दागिने अज्ञात चोरटयाने चोरुन नेले होते. त्यावरुन पो.स्टे.शिवाजीनगर बीड येथे गुरनं ५६८/२०२४ कलम ३०३(२) भा.न्या.सं. प्रमाणे गुन्हयाची नोंद करण्यात आली होती.**

पोलीस निरीक्षक श्री. उस्मान शेख यांनी सदर गुन्हयाचा समांतर तपास करुन गुन्हा उघडकीस आणण्यासाठी पोउपनि श्रीराम खटावकर व पथकाले दिले. त्यावरुन पोउपनि खटावकर यांनी सदर गुन्हयाचा स्था.गु.शा.बीड समांतर तपास करीत असतांना दिनांक ०९/०१/२०२५ रोजी गोपनिय बातमिदाराकडुन गुप्त बातमी मिळाली की, सदरचा गुन्हा शिल्पा गब्या चव्हाण रा.पाथर्डी जि.अहिल्यानगर हिने केला असून ती शिरुर कासार येथे आहे. या खात्रीलायक बातमीवरुन संशयीत महिलेचा अभिलेख तपासणी केला असता सदर महिले अशा प्रकारचे चोरी करण्याची सवई असल्याने सदर महिलेचा शिरुर कासार भागात शोध घेण्यात सुरुवात केली. शिरुर येथुन तिचे बहिनेचे घरुन महिलेस ताब्यात घेवुन तिस बारकाईने विचारपुस केली असता तिने गुन्हा केल्याचे कबुली केले. तिस पो.स्टे. शिवाजीनगर यांचे ताब्यात देण्यात आले असुन तिचे ताब्यातुन एकुण १० तोळयाचा सोन्याचे दागिने कि.अं.५,८२,०००/- रु चा सोन्याचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी मा.श्री. नवनीत कॉवत पोलीस अधीक्षक,बीड , मा.श्री. सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड, पोनि श्री. उस्मान शेख स्था.गु.शा.बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि श्रीराम खटावकर, पोउपनि सिध्देश्वर मुरकुटे, ग्रपोउपनि तुळशिराम जगताप, पोह/ मनोज वाघ, कैलास ठोंबरे, राहुल शिंदे, अशोक दुबाले, दिलीप खांडेकर, मपोह/सुशिला हजारे, पोना/विकास वाघमारे, सोमनाथ गायकवाड,बाळु सानप, पोशि/ अलिम शेख , अश्विनकुमार सुरवसे, चापोशि/ सुनिल राठोड, व मांजरे यांनी मिळुन केली आहे.

## पुरोगामी संघर्ष परिषदेच्या मराठवाडा अध्यक्षपदी शाम साळवे यांची निवड

जालना- पुरोगामी संघर्ष परिषदेच्या मराठवाडा विभागाच्या वरिष्ठ अध्यक्षपदी शाम कचरू साळवे मुक्काम पोस्ट दाढेगाव तालुका अंबड जिल्हा जालना यांची निवड झाली असून, पुरोगामी संघर्ष परिषदेचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष संघर्ष नायक डॉ. प्रा. सुभाष वायदंडे यांनी त्यांना निवडीचे पत्र दिले आहे.



जालना जिल्ह्यामध्ये सामाजिक चळवळीतून कसलंही तोड पाणी न करणारा कार्यकर्ता म्हणून शाम साळवे यांची जिल्ह्याला ओळख आहे. तंटामुक्ती अध्यक्ष ते शेतकरी सहकारी सोसायटी संचालक म्हणून त्यांनी आपल्या नावाचा लौकिक मिळवला असून, समाजात तळागाळामध्ये जाऊन अन्यायाच्या विरोधात लढा उभा करून न्याय देण्याचे काम शाम साळवे यांनी वडिलांचा वारसा चालवला आहे. त्यांच्या कार्याची दखल घेऊन विस्ताराने मोठा असलेल्या मराठवाडा विभागाच्या सामाजिक चळवळीच्या वरिष्ठ अध्यक्षपदाची जबाबदारी त्यांना देण्यात आली आहे.निवडी नंतर बोलताना शाम साळवे म्हणाले की, अनेक सामाजिक चळवळींचा भूतकाळातील इतिहास मी बघितला असून भविष्यात त्याच्यामध्ये सुधारणा करून राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष डॉ. सुभाष वायदंडे यांच्या नेतृत्वाखाली पुरोगामी संघर्ष परिषदेचा विचार आणि काम गावोगावी पोहोचवण्याचे काम करणार आहे. त्यांच्या निवडीमुळे सर्वत्र आनंद व्यक्त केला जात आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे लागले वेद

## इच्छुकांना फुटला माणूसकीचा पाझर: अनेकांनी बांधले गुडघ्याला बाशिंग

सुरेश /कांबळे

आष्टी प्रतिनिधी, लोकसभा निवडणुकीपाठोपाठ नुकतीच विधानसभा निवडणूक ही झाली त्यामुळे नगरपंचायत ,जिल्हा परिषद ,व पंचायत समितीच्या निवडणुका कडे लक्ष लागले आहे आता होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका होणार असल्याने तालुक्यातील सर्वच इच्छुकांनी तयारी सुरू केली आहे नगरपंचायतीसाठी ही इच्छुकांची चाचणी सुरू झाली आहे अनेकांना नगरसेवक पदाची स्वप्न पडू लागली आहे व माणुसकीचा पाझर फुटू लागला आहे विधानसभा निवडणुकीत महायुतीला मिळालेल्या अभूतपूर्व यशानंतर



मागील दोन ते चार वर्षापासून लांबणीवर पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणुकीची चर्चा सुरू झाली आहे असे असले तरी प्रभाग व प्रभाग रचना ओबीसी आरक्षण मतदार यादी तयार करणे यासाठी बराच कालावधी लागण्याची शक्यता आहे त्यामुळे तूर्तास या निवडणुका घेणे शक्य नसल्याचे सांगण्यात येत आहे राज्यातील तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थेतील प्रभागातील सदस्य संख्या वाढवण्याचा निर्णय घेतला होता मात्र नंतर महायुतीने या निर्णयाला स्थगिती दिली आहे लोकसभा विधानसभा निवडणुका झाल्याने आता स्थानिक स्वराज्य संस्थांची बिगुल वाजेल अशी चर्चा राजकीय वर्तुळात होत आहे फेब्रुवारीमध्ये दहावी बारावीची परीक्षा असल्याने या निवडणूक मार्च एप्रिलमध्ये होतील असे जाणकाराची मत आहे तालुक्यात लोकसभा विधानसभेची निवडणूकीत आपल्या नेत्यांच्या विजया यासाठी जिल्हा परिषद पंचायत समिती व नगरपंचायत निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक असलेल्यांनी मोठी जबाबदारी पार पाडली व नेत्याचा जल्लोष साजरा केला त्यामुळे उमेदवारीची माळ आपल्याच गळ्यात पडेल असे गृहीत धरून इच्छुकांनी जिल्हा परिषद पंचायत समिती व नगरपंचायतचे निवडणुकीची तयारी सुरू केली आहे निवडणूक जवळ येत असल्याने आता संभाव्य गुडघ्याला बाशिंग बांधून असलेल्यांना आता माणुसकीचा पाझर फुटू लागला आहे आमदार सुरेश धस यांच्या विजयने महायुतीमध्ये इच्छुकांची संख्या वाढणार आहे तरी स्थानिक पातळीवरील पक्ष ऐवजी व्यक्ती बघूनच मतदान होत आलेली आहे

# करेवाडी येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष युवक- युवती शिबिरांचे उद्घाटन संपन्न




सिरसाळा ।प्रतिनिधी

परळी तालुक्यातील शिरसाळा सर्कलमधील मोजे करेवाडी शिरसाळा: श्री पंडित गुरु पार्डीकर महाविद्यालय शिरसाळा राष्ट्रीय योजना विभागाचे विशेष युवक युवती शिबिर २०२४ ते २५ उद्घाटन समारंभ दिनांक १६ .१. २०२५. रोजी गुरुवार करेवाडी येथे संपन्न झाला यावेळी डॉक्टर रघुनाथराव शेटे उद्घाटक म्हणून उपस्थित होते कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माननीय व्यंकटराव कदम अध्यक्ष रामेश्वर विभाग प्रसारक मंडळ सोनपेठ यांनी भुसषले. तर मार्गदर्शक म्हणून सिरसाळा पोलीस स्टेशनचे. ए.पी.आय. श्री. दहिफळे साहेब. हे उपस्थित होते.स्वाती गुंजाळ मॅडम पोलीस स्टेशन सिरसाळा विस्तार अधिकारी श्री शेंडगे साहेब. परळी उपस्थित होते.या कार्यक्रमासाठी गावचे सरपंच. श्रीमती. कमलबाई कावळे उपसरपंच सौ. शामल घाटोळ तसेच गावचे प्रतिष्ठित नागरिक बापूसाहेब भाऊ जाधव. श्रीधर कांबळे .महाविद्यालयाचे प्राचार्य के.के.पाटील. डॉक्टर एचपी कदम. डॉ.एम.बीड.धोंडगे सर.प्राध्यापक.विक्रम धनवे सर.हे विचार मंचावर उपस्थित होते.यावेळी उद्घाटन भाषणात डॉक्टर रघुनाथराव शेटे मनाली की.राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून स्वयंसेवकाच्या डॉक्टर जे आर सोळुंके. यांनी केले.व आभार. प्राचार्य. दयानंद झिंजुर्डे सर. यांनी मानले.यावेळी ८० ते ९० राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व ग्रामस्थ प्राध्यापक .उपस्थित होते.

# अखेर शालेय विद्यार्थ्यांच्या दुसऱ्या गणवेशाची प्रतिक्षा संपली ; प्रजासत्ताक दिन नविन गणवेशात साजरा होणार

## सरकारला ऊशिरा का होईना शहाणपण सुचले आणि गणवेशाची जबाबदारी शालेय व्यवस्थापनावर :- डॉ.गणेश ढवळे

बीड : समग्र शिक्षा अंतर्गत शासकीय तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील इयत्ता १ ली ते ८ वी मधील सर्व मुली, अनुसूचित जाती जमाती प्रवर्गातील मुले तसेच दारिद्र्यरेषेखालील पालकांची मुले यांना मोफत गणवेश योजनेचा लाभ देण्यात येतो. सन २०२४-२५ मध्ये एक राज्य एक गणवेश योजना राबविण्यात आली. यात अनेक मुलांना स्वातंत्र्य दिन जुन्या गणवेशावर साजरा करावा लागला तर दिवाळीनंतर शैक्षणिक सत्र सुरू होऊन दोन महिने उलटूनही दुसऱ्या गणवेशाची प्रतिक्षा होती. संबंधित प्रकरणात सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे यांनी गतवर्षी प्रमाणेच गणवेशाचे कामकाज शालेय व्यवस्थापन समिती मार्फत करण्यात यावे जेणेकरून विद्यार्थ्यांना वेळेवर गणवेश मिळेल यासाठी जिल्हाधिकारी बीड, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड, शिक्षणाधिकारी ( प्राथमिक) जिल्हा परिषद बीड यांना लेखी निवेदनाद्वारे मागणी करत आंदोलनाचा ईशारा दिला होता.त्यानंतर शिक्षणाधिकारी भगवान फुलारी यांनी दीड कोटीचा निधी सीईओंच्या मान्यतेने गटशिक्षणाधिकारी यांना पीएफएमएस प्रणाली द्वारे वर्ग करण्यात आला आणि आज अखेर शालेय विद्यार्थ्यांना दुसरा गणवेश मिळाला आहे.त्यामुळे प्रजासत्ताकदिन विद्यार्थ्यांना गणवेशात साजरा करता येणार आहे.आज दि.१७ शुक्रवार रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश केंद्रीय जिल्हा परिषदेच्या शाळेत दुसऱ्या शालेय गणवेशाचे वाटप करण्यात आले यावेळी मुख्याध्यापक आबासाहेब हांगे,सहशिक्षक अमर पुरी,संदिपान आगम, माधुरी कुलकर्णी, सुवर्णा अयाचित आणि सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे व पत्रकार हरीओम क्षीरसागर उपस्थित होते.

सन २०२४ -२५ मध्ये एक राज्य एक गणवेश योजना राबविण्यात आली.पहिल्या गणवेशासाठी गणवेशाचा थेट कटींग कपडा पुरवठा करून तो बचतगटांमार्फत शिलाई करून घेण्यात आला.परंतु विद्यार्थी संख्या पाहता गणवेश शिलाईसाठी यंत्रणा अपुरी पडली त्याच बरोबर एकाच वर्गातील विद्यार्थ्यांना एकाच मापाचे गणवेश देण्यात आले होते त्यामुळे काहींना आपरे तर काहींना ढगळे होत असल्याने गणवेश मिळुनही विद्यार्थ्यांकडुन ते घालण्यात येत नव्हते.नविन वर्षांपासून शासनाने गणवेश वितरणाची जबाबदारी पुन्हा शालेय व्यवस्थापन समितीवर सोपविण्यात आल्याने येत्या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना त्यांच्या योग्य मापाचे गणवेश मिळणार आहेत.त्याच बरोबर




स्थानिक विक्रेते किंवा गणवेश शिलाई करून देणारे बचतगट,टेलर यांना रोजगार मिळणार आहे . त्यामुळे ऊशिरा का होईना सरकारला शहाणपण सुचले याबद्दल डॉ.गणेश ढवळे यांनी समाधान व्यक्त केले आहे.

बीड जिल्ह्यातील योजनेत पात्र १ लाख ४४ हजार ३१५ विद्यार्थ्यांच्या स्काऊट गाईड व अनुरूप गणवेश शिलाईची रक्कम प्राथमिक शिक्षण परीषदेकडुन मंजूर करून प्रतिगणवेश संच शिलाई १०० रूपये व अनुषंगिक खर्च म्हणून १० रूपये असे एकूण ११० रूपये याप्रमाणे १ कोटी ५८ लाख ७४ हजार ६५० रूपयांचा निधी शिक्षणाधिकारी ( प्राथमिक) जिल्हा परिषद बीड भगवान फुलारी यांनी सीईओंच्या मान्यतेने गटशिक्षणाधिका- यांना पीएफएमएस प्रणालीद्वारे वर्ग केल्याचे सांगितले.तालुका आंबेजोगाई गणवेश व लाभार्थी ११,०४५ , वितरित निधी १२, १४,९५० तालुका आष्टी गणवेश व लाभार्थी १६,१२१ वितरित निधी १७,७३,३१० तालुका बीड गणवेश व लाभार्थी २४,५२७ वितरित निधी २६,९७,९७० तालुका धारूर गणवेश व लाभार्थी ८,७८६ वितरित निधी ९,६६,४६० गेवराई तालुका गणवेश व लाभार्थी २३,०३१ वितरित निधी २५,३३,४१० केज तालुका गणवेश व लाभार्थी १४,०८४ वितरित निधी १५,४९,२४० परळी तालुका गणवेश व लाभार्थी ९,००६ वितरित निधी ९,९०,६६० पाटोदा तालुका गणवेश व लाभार्थी ७,९०८ वितरित निधी ६,६९,८८० शिरूर तालुका गणवेश लाभार्थी ६,८५९ वितरित निधी ७,५४,४९० वडवणी तालुका गणवेश व लाभार्थी ६,८८६ वितरित निधी ७,५५,२६० ईतका निधी वितरित करण्यात आला असआहे . स्काऊट गाइड व अनुरूप गणवेश शिलाई प्रति गणवेश ११० रूपये याप्रमाणे लाभार्थी संख्येनुसार वितरित करण्यात आले आहेत.या निधीचा विनियोग गणवेश शिलाईच्या कामासाठीच करावा.गणवेश शिलाईचे देयक प्राप्त झाल्यानंतरच निधी अदा करावा.अनियमितता होणार नाही व कोणतीही तक्रार उद्भवणार नाही याची दक्षता घ्यावी असे निर्देश शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद बीड भगवान फुलारी यांनी सर्व गटशिक्षणाधिका-यांना दिले असल्याचे सांगितले.लिंबागणेश केंद्रीय जिल्हा परिषद शाळेत गणवेश वाटप करताना डॉ.गणेश ढवळे, पत्रकार हरिओम क्षीरसागर, सहशिक्षक अमर पुरी, संदिपान आगम ,माधुरी कुलकर्णी,सुवर्णा अयाचित व विद्यार्थी

# बीड जिल्हा पुन्हा हादरला

**अंभोरा ठाणे हद्दीतील वाहिरा येथील घटना**

आष्टी प्रतिनिधी ,, गुरुवारी वाहिरा येथे रात्री दहाच्या दरम्यान तीन सख्या भावावर त्याच्या समाजातील काही लोकांनी लोखंडी रॉड व धारदार शस्त्राने हल्ला केला या हल्ल्यात दोन सख्या भावांचा जागीच मृत्यू झाला तर अन्य एक भाऊ गंभीर जखमी झाल्याची घटना अंभोरा पोलीस ठाणे हद्दीत घडली अजय विलास भोसले ,भरत विलास ,असे मयताचे नाव असून कृष्णा विलास भोसले हा गंभीर जखमी झाला आहे आष्टी तालुक्यातील हातोळण येथील अजय विलास भोसले, भरत विलास भोसले, कृष्णा विलास भोसले, हे तिघे भाऊ वाहिरा येथे गुरुवारी आले होते याच ठिकाणी वाहिरा गावातील व बाहेरील लोक जमा झाली होती गुरुवारी दुपारपासूनच हे सगळे याच ठिकाणी होते रात्री साडेनऊ ते दहा च्या दरम्यान यातील काही लोकांनी या तिन्ही भावावर लोखंडी रॉड व धारदार शास्रांनी हल्ला चढवला या हल्ल्यात अजय विलास भोसले भरत विलास भोसले या दोन सख्या भावाचा जागीच मृत्यू झाला तर तिसरा भाऊ कृष्णा विलास भोसले, हा गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर अहिल्यानगर येथे उपचार सुरू आहेत या घटनेतील सात संशयित आरोपींना अंभोरा पोलिसांनी ताब्यात घेतले आहे हा खून का ? व कोणत्या कारणावरून केला हे अद्याप समजले नाही दोन्ही मृतदेह आष्टी ग्रामीण रुग्णालयात ठेवण्यात आले आहेत घटनास्थळी अंभोरा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे ,पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत तावरे ,बाबासाहेब गर्जे ,मनोज कुमार खंडागळे ,भरत माने ,बाबुराव तांदळे ,लुईस पवार ,दत्तात्रय टकले ,पोलीस आमदार शिवदास केदार, सतीश पैठणे, अमोल शिरसाठ ,यांनी घटनास्थळी भेट देऊन मोठ्या सीताफिने सात संशयतांना ताब्यात घेतले

# १ फेब्रु रोजी आयोजित मराठी पत्रकार परिषदेच्या मेळावा पुरस्कार वितरण सोहळ्यात सहभागी व्हावे-प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे

## डिजिटल मिडिया परिषदेची बुलढाण्यात जिल्हास्तरीय बैठक उत्साहात
## डिजिटल मिडिया परिषदेच्या जिल्हाध्यक्ष पदी मयुर निकम व श्रीधर ढगे

नवनियुक्त पदाधिकाऱ्यांसह उल्लेखनीय कार्य करणार्या पदाधिकार्यांचा झाला सन्मान

बुलढाणा : मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त मा.श्री.एस.एम.देशमुख सर यांच्या आदेशानुसार मराठी पत्रकार परिषद संलग्नित असलेल्या डिजिटल मीडिया परिषदेची बुलढाणा जिल्हा स्तरीय बैठक प्रदेशाध्यक्ष अनिलजी वाघमारे साहेब यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडली.मागील दोन वर्षात डिजिटल मीडिया परिषदेच्या माध्यमातून बुलढाणा जिल्ह्यात संघटक संघटनात्मक सक्रिय काम केल्याबद्दल खामगाव येथील ज्येष्ठ पत्रकार बळीरामजी वानखडे तर तसेच चिखली येथील डिजिटल मीडिया परिषदेचे तालुकाध्यक्ष सुनील मोरे राज्यस्तरीय डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट पथक आणि त्या पुरस्कार मिळाल्याबद्दल नारायण दाभाडे यांचा यावेळी सत्कार करण्यात आला तसेच मराठी पत्रकार परिषदेचे राज्य उपाध्यक्ष चंद्रकांत बर्दे बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष रणजीतसिंह राजपूत यांची नियुक्ती झाल्याबद्दल डिजिटल मीडिया चे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे व प्रदेश उपाध्यक्ष अनिल उंबरकर यांनी त्यांचा यथोचित सत्कार केला. बैठकीमध्ये बुलढाणा जिल्हा डिजिटल मीडियाच्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. यामध्ये विभागीय सचिव म्हणून जितेंद्र





कायस्थ,घाटावर जिल्हाध्यक्ष झी २४ तास चे जिल्हा प्रतिनिधी मयूर निकम तर घाटाखालील जिल्हाध्यक्ष श्रीधर ढगे ओटीटी न्यूज चे संपादक जिल्हा सरचिटणीस दीपक मोरे,जिल्हा उपाध्यक्ष नारायण दाभाडे,

किशोर खंडारे यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचाही सत्कार करण्यात आला न्यूज पोर्टल युट्युब चॅनेल च्या संपादक व पत्रकारांनी सत्य बातमी दाखवून लोकांमध्ये विश्वासाहर्ता वाढवावी असे आवाहन करून भविष्यात डिजिटलच्या पत्रकारांनी अधिस्वीकृती मिळाली पाहिजे,यासाठी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम देशमुख सरांचे मार्गदर्शनात लढा सुरू असल्याचे सांगत येत्या एक फेब्रुवारी रोजी सेलू जिल्हा परभणी येथे होत असलेल्या आदर्श पुरस्कार वितरण सोहळ्यात सहभागी होण्याचे आवाहन ही प्रदेशाध्यक्ष अनिलजी वाघमारे यांनी केले.यावेळी डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य उपाध्यक्ष अनिल उंबरकर, बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष शेख वसिमभाई,सरचिटणीस शेख कासिमभाई, हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा समन्वयक राजेश डिखोळकर, आदीसह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

# माझ्या मालकावर अन्याय झाला मला न्याय कोण देणार ?-सौं.-मजिली वाल्मीक कराड

परळी ।प्रतिनिधी

दिनांक १५ बीड जिल्ह्यातील मसाजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर समोर आलेल्या खंडणीप्रकरणी वाल्मीक करारावर मोका का अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.त्यानंतर आज मी कराड यांना बीडच्या न्यायालयाने सात दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. यानंतर आज वाल्मीक कराड यांच्या पत्नी मंजिरी कराड यांनी. माझ्या नवऱ्यावर अन्याय झाला आहे.मला कोण न्याय देणार ?असा प्रश्न केला आहे.यावेळी बोलताना मंजिली कराड म्हणाल्या आज संतोष देशमुख यांचे कुटुंब न्याय मागायला मनोज जरांगे यांच्याकडे जात आहेत माझ्या नवऱ्यावर सुद्धा अन्याय झाला आहे मी माझ्या नवऱ्यासाठी न्याय मागते मला न्याय कोण देणार आहे .मीडिया ट्रायल करून माझ्या नवऱ्याची एक एक गोष्ट बाहेर काढत आहेत ज्यांनी ज्यांनी हे केले. त्यांचे प्रकरणे बाहेर काढणार आहे यामध्ये सूर्याचा संदीप क्षीरसागर बजरंग शिंदे अंजली दामणिया यांचे काही गोष्टींनी बाहेर काढणार आहे वाल्मीक कराडला पोलीस कोतरी खोटवल्यानंतर परळीत आंदोलन सुरू असून कराड समर्थकांनी आपली बदली दिली बीड शहरात वाल्मीक कराड समर्थक आणि ठिय्या आंदोलन सुरू केले आहे. वाल्मीक कराडाची ७५ वर्षाची आई आणि पत्नी या आंदोलनात सहभागी आहेत त्यावेळी त्यांच्या पत्नीने मध्यमाशी बोलताना करा वरील आरोप पेटवून लावले आहे बीडच्या मासाजोक गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मीक कराड याला कोर्टाने आजचा दिवसाची सीआयडी सोनाली यानंतर वाल्मीक कराड यांची पत्नी मजिली कराड यांनी पत्रकार परिषद घेऊन भूमिका मांडली यावेळी त्यांनी मराठा नेते म्हणून जरागे पाटील यांना भावनिक साथ घातली तसेच त्यांनी भाजप आमदार सुरेश धस राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार संदीप क्षीरसागर यांचा उल्लेख करत त्यांची प्रकरण समोर आणणार असल्याचा इशारा दिला वाल्मीक कराड यांच्या समर्थकांनी त्यांच्या ग्रुप पाटीवर प्रगतीवर आपल्याला परीने आपल्या आपल्या ठिकाणी आंदोलन सुरू केले आहे. आजची जी घडामोड आहे. तुम्ही ऐकलं असेल न्यायव्यवस्थेवर तुमचा विश्वास असेल तर. न्यायालयाने सुद्धा त्यांना विचारला आहे. न्यायाधीश सुरेखा पाटील यांनी सुद्धा तपास अधिकाऱ्यांना प्रश्न



# पत्रकार नवनाथ आडे यांची सायं.दै महाराष्ट्र आरंभच्या उपसंपादकपदी निवड



## नवनाथ आडे यांची निर्भीड पत्रकारिता प्रेरणादायी व समाजासाठी दिशादर्शक - संपादक
## पत्रकारिता हाच माझा श्वास सर्वसामान्यांच्या न्यायासाठी सतत सत्य लिहिणार - नवनाथ आडे

बीड निवासी संपादक उद्धव आरे

गेवराई तालुक्यातील ग्रामीण भागातील असलेले पत्रकार नवनाथ नवनाथ आडे यांच्या पत्रकारिता क्षेत्रातील कार्याला पाहता त्यांची तालुका प्रतिनिधी वरून सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ या दैनिकाच्या उपसंपादक पदी निवड करण्यात आली आहे. आजच्या पत्रकारिता क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात डिजिटल मिडिया तसेच साप्ताहिक, दैनिक वर्तमानपत्राद्वारे अनेक पत्रकार कार्य करत आहेत. पत्रकार क्षेत्रातील नव्याने नावलौकिक मिळवलेले गेवराई तालुक्यातील कोमलवाडी या ग्रामीण गावातील पत्रकार नवनाथ आडे यांनी आपल्या परखड आणि निर्भीड लेखणीच्या माध्यमातून सर्व सामान्यांना न्याय मिळवून देण्याचे काम केले आहे. तसेच अगदी सामाजिक, शैक्षणिक व पत्रकारिता क्षेत्रामध्ये आपला ठसा उमटवला असून, मोठा दबदबा निर्माण केला आहे. स्वतः दिव्यांग असून पत्रकारिता क्षेत्रामध्ये निर्भीडपणे काम करत पत्रकारितेच्या माध्यमातून समाजकार्य करत आहे. यामुळे त्यांचे सर्वत्र स्तरावर कौतुक करून शुभेच्छा देत आहेत. पत्रकारिता क्षेत्रामध्ये पत्रकार नवनाथ आडे यांनी नावलौकिक मिळवल्याने, त्यांच्या या निर्भीड कार्याला पाहता सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ या दैनिकाच्या उपसंपादक पदी निवड करण्यात आली आहे. पत्रकार नवनाथ आडे यांनी निर्भीड आणि निस्वार्थ भावनेने पत्रकारिता क्षेत्रामध्ये काम करत आहेत. अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार विरोधात परखड लेखणीच्या माध्यमातून शासनदरबारी आवाज उठवत तसेच समाजातील खरे वास्तव मांडून निर्भीड पत्रकारितेतून लोकशाहीचा चौथा स्तंभ बळकट करण्याचे काम करत आहेत. गोरगरीब सर्व सामान्यांच्या हितासाठी परखड आणि निर्भीड लेखणीतून आवाज उठवत आपल्या सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ या दैनिकातून समाज प्रबोधनाचे काम केले. त्यांनी सामाजिक परिस्थिती जाणून समाज्यातील अन्यायाविरोधात वाचा फोडण्याचे काम केले. लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून आपल्या लेखणीतून समाज प्रबोधन होत आहे. पत्रकार नवनाथ आडे यांच्या पत्रकारिता क्षेत्रातील कार्याला पाहता त्यांची तालुका प्रतिनिधी वरून उपसंपादक पदी निवड करून मोठी जबाबदारी देण्यात आली आहे. पत्रकारितेच्या माध्यमातून समाजातील सर्व घटकांना न्याय देण्याची त्यांची भूमिका तत्पर आहे. कणखर आणि निर्भीड पत्रकारिता हे त्यांचे वैशिष्ट्य असून, ते अधिकाधिक अजून धारधार व्हावे, अशा शुभेच्छा मिळत आहे. अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार विरोधात पत्रकारितेच्या माध्यमातून निर्भीडपणे आवाज उठवणार आणि सतत सत्य लिहिणार असल्याचे पत्रकार नवनाथ आडे यांनी सांगितले. त्यांच्या या निवडीने सर्व स्तरावरून त्यांना शुभेच्छा मिळत असून नवनाथ आडे यांनी संपादक दीपक थोरात व सर्व महाराष्ट्र आरंभ

# कामगार नाट्य स्पर्धेत चकवा चांदणंला प्रथम तर चाफा सुगंधीला द्वितीय पारितोषिक

परळी (प्रतिनिधी)

कामगार कल्याण मंडळाच्या ७०व्या कामगार नाट्यस्पर्धेत ललित कला भवन सिडकोचे चकवा चांदणं प्रथम तर कामगार कल्याण भवन लातूरचे चाफा सुंगंधी द्वितीय, कामगार कल्याण केंद्र कळंबचे पून्हा पून्हा मोहोंदोजारोला तृतीय, कामगार कल्याण केंद्र निलंगाचे किरवंतला उत्तेजनार्थ प्रथम तर कामगार कल्याण केंद्र चौफाळाचे शापित सेवाला उत्तेजनार्थ द्वितीय पारितोषिक मिळाले.



महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने कामगार नाट्य स्पर्धेचे आयोजन दरवर्षी केले जाते. हे स्पर्धेचे हे ७० वे वर्ष होते. या स्पर्धेचे पारितोषिक वितरण बुधवारी ललित कला भवन उस्मानपुरा येथे झाले. पारितोषिक वितरण समारंभाच्या अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नाट्यशास्त्र विभाग प्रमुख वैशाली बोदेले हे होत्या. तर प्रमुख पाहूणे म्हणून जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाणे, भाजपा महिला मोर्चाच्या प्रदेश सरचिटणीस मिनाताई मिसाळ, युनायटेड ब्रेव्हरीज लिमि.चे वरीष्ठ मानव संसाधन व्यवस्थापक बिपीन सुपेकर, मराठवाडा विभागाचे सहाय्यक कल्याण आयुक्त भालचंद्र जगदाळे, स्पर्धेचे परीक्षक सुरेखा मसाळ, प्रा. प्रदीप कांबळे, प्रा. कैलास टापरे यांच्या उपस्थितीत झाले. उत्कृष्ट अभिनय पुरुष गटासाठी १३ बक्षीसे, उत्कृष्ट महिला अभिनयसाठी ८ बक्षीसे, उत्कृष्ट दिग्दर्शन ३ बक्षीसे, उत्कृष्ट नेपथ्य ३ बक्षीसे, उत्कृष्ट पार्श्वसंगीतसाठी ३ बक्षीसे, उत्कृष्ट प्रकाश योजनेसाठी ३ बक्षीसे देण्यात आले.सुत्रसंचालन महेश विभांडीक यांनी तर आभार जिज्ञेश पाटील यांनी केले.

# वाचन संकल्प महाराष्ट्राचा या अभियानांतर्गत नवगण महाविद्यालयामध्ये विविध कार्यक्रम

परळी (प्रतिनिधी)

येथील नवगण शिक्षण संस्थेच्या कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयांमध्ये आज दिनांक १ जानेवारी ते १५ जानेवारी या कालावधीमध्ये नवीन शैक्षणिक धोरण २०२० नुसार वाचन संकल्प महाराष्ट्राचा हे अभियान राबविण्यात आले असून या अंतर्गत विविध उपक्रम घेण्यात आले. यावेळी एक जानेवारी रोजी वाचन संकल्प महाराष्ट्राचा याचे उद्घाटन करण्यात आले तर तीन जानेवारी रोजी संविधानाचे सामूहिक वाचन करण्यात आले. वाचन संस्कृती विषयी बोलताना प्राचार्य डॉ मधुकर आघाव यांनी सांगितले की इलेक्ट्रॉनिक्स



उपकरणामुळे व सोशल मीडियामुळे वाचन कमी होत आहे वाचन संस्कृती जोपासणे आणि विद्यार्थ्यांच्या हाती पुस्तक देणे हे शिक्षकांचे आद्य कर्तव्य झालेले आहे.कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ एल बी घुमरे, एन एस एस कार्यक्रमाधिकारी डॉ बबन मोहिते, ग्रंथपाल प्रा सुभाष लांडगे , छएझ प्रमुख डॉ अनुरथ चंद्रे यांच्यासह महाविद्यालयातील सर्व कर्मचारी बांधवांची उपस्थिती होती यावेळी विविध महत्त्वपूर्ण ग्रंथ व पुस्तके यांची ओळख करून देण्यात आली तसेच ग्रंथालयाची स्वच्छता करण्यात आली.

# तुम्हाला ठाऊक आहे का 'महाकुंभाच्या' विविध प्रकारांबद्दल ?

महाकुंभाचे आयोजन मोठ्या प्रमाणावर केले जाते. ऋषी-मुनी या महान सोहळ्याची आतुरतेने वाट बघत असतात. यंदाचा महाकुंभ १३ जानेवारीपासून सुरु होत आहे आणि २६ फेब्रुवारी रोजी सांगता होईल. प्रयागराजमध्ये सुरु होणाऱ्या महाकुंभाला विशेष महत्त्व आहे कारण प्रयागराजमध्ये गंगा, यमुना आणि सरस्वती यांचा संगम होतो. हा संगम जगभर प्रसिद्ध आहे.

मागच्या भागात आपण पवित्र मेळ्याची उत्पत्ती हिंदू पौराणिक कथांमध्ये खोलवर रुजलेली आहे, विशेषत: समुद्र मंथन (समुद्र मंथन), जे देव आणि दानव अमृत मिळविण्यासाठी झाले होते हे बघितले. या भागात आपण कुंभमेळ्याचे प्रकार जाणून घेणार आहोत.

कुंभमेळ्याचे आयोजन प्राचीन काळापासून केले जात आहे, परंतु या मेळ्याचा पहिला लिखित पुरावा महान बौद्ध यात्रेकरू ह्युएन त्सांग यांच्या लिखाणातून मिळतो, ज्यामध्ये सहाव्या शतकात सम्राट हर्षवर्धनच्या काळात झालेल्या कुंभमेळ्याचे प्रसंगोपात वर्णन केले आहे. कुंभमेळा चार ठिकाणी आयोजित केला जातो - हरिद्वार, प्रयाग, नाशिक आणि उज्जैन.

३ जानेवारी ते २६ फेब्रुवारी या कालावधीत प्रयागराजमधील गंगा आणि यमुना यांच्या संगमावर महाकुंभ २०२५ चे आयोजन करण्यात येणार आहे. महाकुंभ हा जगातील सर्वात मोठा धार्मिक मेळा आहे. ४५ दिवस चालणारा हा महाकुंभ हिंदूसाठी खूप महत्त्वाचा आहे. या कालावधीत एकूण सहा शाही स्नान होणार आहे. यावेळी महाकुंभात देश-विदेशातील ४० कोटींहून अधिक लोक सहभागी होतील, अशी अपेक्षा आहे. २०१९ मधे प्रयागराज येथे शेवटचा अर्धकुंभ मेळा पार पडला होता. तर यापूर्वी २०१३ मध्ये प्रयागराजमध्ये महाकुंभाचे आयोजन करण्यात आले होते. तर हरिद्वारमध्ये कुंभमेळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

वास्तविक, कुंभमेळ्याचे चार प्रकार आहेत - कुंभ, अर्ध कुंभ, पूर्ण कुंभ आणि महाकुंभ. सर्व कुंभमेळे ग्रहांच्या स्थितीनुसार आयोजित केले जातात. कुंभमेळ्याच्या आयोजनासाठी वर्षातील वेळही खूप महत्त्वाची असते. प्रत्येक कुंभमेळ्याचे स्वतःचे वेगळे महत्त्व असते.

महाकुंभ

दर १४४ वर्षांनी केवळ प्रयागराजमध्ये महाकुंभ आयोजित केला जातो. पौराणिक मान्यतेनुसार, एकूण १२ कुंभांपैकी चार कुंभ पृथ्वीवर आयोजित केले जातात आणि उर्वरित आठ देवलोकात आयोजित केले जातात. ज्योतिषशास्त्रानुसार जेव्हा सूर्य, चंद्र आणि गुरु एका विशिष्ट स्थितीत असतात. मग या ठिकाणी मेळ्यांचे आयोजन केले जाते.




प्रयागराजमध्ये १४४ वर्षांतून एकदा महाकुंभ मेळा भरतो. असे मानले जाते की, महाकुंभमधे देव शाही स्नान करण्यासाठी पृथ्वीवर येतात. त्यामुळे शाही स्नानाचे महत्त्व अधिक आहे

पूर्ण कुंभमेळा: दर १२ वर्षांनी येतो. प्रामुख्याने भारतातील चार कुंभमेळ्याच्या ठिकाणी म्हणजे प्रयागराज, हरिद्वार, नाशिक आणि उज्जैन येथे आयोजित केले जातात. ते या चार ठिकाणी दर १२ वर्षांनी फिरते.अर्ध कुंभ: अर्ध कुंभ हा दर सहा वर्षांनी साजरा केला जातो. अर्धकुंभचे आयोजन प्रयागराज आणि हरिद्वार या दोनच ठिकाणी केले जाते. अर्ध म्हणजे अर्धा. त्यामुळे सहा वर्षांनी त्याचे आयोजन केले जाते.सिंहस्थ कुंभा : सिंहस्थ कुंभाचे आयोजन खास नाशिक आणि उज्जैन येथे केले जाते. ज्योतिषशास्त्रात सिंहस्थ कुंभ सिंह राशीशी संबंधित आहे. या ठिकाणी सिंहस्थ कुंभाचे आयोजन तेव्हाच केले जाते जेव्हा गुरु सिंह राशीत असतो आणि सूर्य मेष राशीत असतो.माघ कुंभ मेळा: याला मिनी कुंभ मेळा असेही म्हणतात जो दरवर्षी आणि फक्त प्रयागराज येथे भरतो. हे हिंदू दिनदर्शिकेनुसार माघ महिन्यात आयोजित केले जाते.कुंभमेळ्याचे ठिकाण सूर्य, चंद्र आणि गुरु या काळात वेगवेगळ्या राशींमध्ये धारण केलेल्या स्थितीनुसार ठरवले जाते.महाकुंभमेळा केव्हा आणि कसा आयोजित केला जातो?

प्रयागराज

प्रयागराजमध्ये महाकुंभमेळ्याचे आयोजन हे जेव्हा गुरु ग्रह वृषभ राशीत असतो त्यावेळी केले जाते. सध्या गुरु याच राशीत आहे. १४ जानेवारी २०२५ रोजी मकर राशीत सूर्याचा प्रवेश झाल्यानंतर प्रयागराजमध्ये महाकुंभमेळ्याचे आयोजन केले जाते. गंगा, यमुना आणि अदृश्य सरस्वती यांचा संगम प्रयागराजमध्ये होतो.

हरिद्वार

सूर्य मेष राशीत आणि गुरु ग्रह कुंभ राशीत प्रवेश करत असताना हरिद्वारमध्ये महाकुंभमेळ्याचे आयोजन केले जाते. हरिद्वारमध्ये गंगा नदीच्या काठावर महाकुंभमेळ्याचे आयोजन केले जाते.

नाशिक

गुरु आणि सूर्य हे दोन्ही ग्रह सिंह राशीत असतात, तेव्हा महाराष्ट्रातील नाशिक येथे महाकुंभमेळ्याचे आयोजन केले जाते. नाशिकमध्ये गोदावरी नदीच्या काठावर कुंभमेळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

उज्जैन

सूर्य ग्रह मेष राशीमध्ये आणि गुरु ग्रह सिंह राशीमध्ये असताना, सूर्य देवाचे राशीत असताना उज्जैनमध्ये महाकुंभमेळ्याचे आयोजन केले जाते. उज्जैनमधील शिप्रा नदीच्या काठावर महाकुंभमेळ्याचे आयोजन केले जाते.

कुंभ आणि महाकुंभ यातील फरक जाणून घ्या

उज्जैन, प्रयागराज, हरिद्वार आणि नाशिक येथे दर तीन वर्षांनी एकदा कुंभमेळ्याचे आयोजन केले जाते. हरिद्वार आणि प्रयागराजच्या काठावर ६ वर्षांतून एकदा अर्ध कुंभमेळा आयोजित केला जातो. तर पूर्ण कुंभमेळा १२ वर्षांतून एकदा आयोजित केला जातो, जो प्रयागराजमध्ये होतो. १२ कुंभमेळे पूर्ण झाल्यानंतर महाकुंभमेळ्याचे आयोजन केले जाते, याआधी २०१३ साली प्रयागराज येथे महाकुंभाचे आयोजन करण्यात आले होते.

# संस्कार शाळेतील विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संपन्न

परळी (प्रतिनिधी)

शहरातील श्री पद्मावती शिक्षण संस्था संचलित, संस्कार प्राथमिक शाळेत आज एलिमेंट्री व इंटरमिजिएट स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा संपन्न झाला. यावेळी या कार्यक्रमाचे अध्यक्ष कैलास तांदळे प्रमुख पाहुणे म्हणून दीपक तांदळे व पर्यवेक्षक श्री इंगळे सर, ज्येष्ठ शिक्षिका रणखांब मॅडम यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व शिक्षणमहर्षी कै. विठ्ठलराव तांदळे सर यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र राज्य कला शिक्षण बोर्ड तर्फे घेण्यात आलेल्या , चित्रकलेतील एलिमेंट्री परीक्षेत १८ तर इंटरमिजिएट परीक्षेत १५ विद्यार्थ्यांनी यश संपादन केलेले आहे या सर्व विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकांसमवेत सत्कार व गुणगौरव करण्यात आला. यावेळी दीपक तांदळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले ते म्हणाले, आपणा सर्वांना माहितच आहे की भारत सरकारने शिक्षण क्षेत्रात एक नवीन शैक्षणिक धोरण आणलेले आहे या शैक्षणिक धोरणा अंतर्गत विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे हा मूळ उद्देश आहे. मला अभिमानाने सांगावसं वाटते की संस्कार प्राथमिक शाळा ही सुरुवातीपासूनच विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक व भावनिक विकासासाठी कार्य करते. . एवढेच नाही तर आपणा सर्वांना माहित आहे हे स्पर्धेचे युग आहे या स्पर्धेच्या युगात टिकायचे असेल तर लहानपणापासूनच विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची ओळख व्हायला हवी. त्याबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलतेचा विकास व्हावा यासाठी प्रत्येक वर्गावर रोज चित्रकलेचा तास असतो. एकंदरीत आमच्या विद्यार्थ्यांचे आयुष्य उज्वल व्हावे व तो आपल्या देशाचा एक आदर्श व सर्व गुणसंपन्न नागरिक बनावा हा आमचा ध्यास आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे हेच संस्कार प्राथमिक शाळेचे ध्येय आहे.

# शासकीय रेखाकला (इंटरमेजिएट चित्रकला) परीक्षेत सिद्धी देशपांडे हिचे यश

अंबाजोगाई -महाराष्ट्र शासनाच्या तंत्र शिक्षण विभाग व कला संचालनालय मुंबईच्या वतीने घेण्यात येणाऱ्या शासकीय ग्रेड चित्रकला (इंटरमेजिएट) परीक्षेत कु.सिद्धी राहूल देशपांडे हिने ए ग्रेड मानांकन प्राप्त करून घवघवीत



यश संपादन केले आहे तिला चित्रकला शिक्षिका मेघा अकोलकर,डी.आर. बनसोडे यांचे मार्गदर्शन लाभले.सिध्दी देशपांडे ही योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित श्रीमती गोदावरीबाई कुकूंलोळ योगेश्वरी कन्या विद्यालयाची विद्यार्थिनी असून तिच्या यशाबद्दल योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापुरकर,पदाधिकारी जी.बी.व्यास,ॲड. जगदीश चौसाळकर, कमलाकर चौसाळकर,डॉ.शैलेष वैद्य,प्रा.भीमाशंकर शेटे, डॉ.जयश्री देशपांडे(मोटेगांवकर) ॲड.कल्याणी विर्धे यांच्यासह शालेय पदाधिकारी,डॉ.सतिश देशपांडे,प्रा.सतीश पत्की,मोहरीर व पत्की परिवार इतर नातेवाईक यांनी अभिनंदन केले आहे.

बँक जनसेवा निधी लि.बीड

- क्लर्क पदे - २ पदे भरणे आहेत
- बँकिंग क्षेत्रातील अनुभव असणारास प्राधान्य देण्यात येईल,
- आकर्षक वेतन दिले जाईल.
- मुलाखत - दि. १९-०१-२०२५ वार रविवार

स्थळ - तुळजाई चौक पालवन रोड बीड
संपर्क क्रमांक - ९९२१५८४३६४

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT